[वेळ: ३ तास] [ गुण:१००]

सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.
२. उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१** अ) मानवेतर प्राण्यांच्या तुलनेत मानवी भाषा वेगळी कशी ठरते ते थोडक्यात सांगून मानवाचे भाषिक आणि भाषेतर संप्रेषण याविषयी विवेचन करा. २०

किंवा

आ) भाषेच्या सहा मूलघटकांवर आधारलेले भाषिक कार्याविषयीचे रोमान याकोबसन यांचे नमुनारूप स्पष्ट करा.

**प्र.२** अ) भाषिक सापेक्षतावादाविषयीचा सपीर आणि वोर्फ यांचा सिद्धांत विशद करा. २०

किंवा

आ) भाषेच्या विकासाची संकल्पना सांगून भाषेच्या प्रगतीचे निकष किंवा मापदंड सविस्तर स्पष्ट करा.

**प्र.३** अ) 'प्रमाण भाषा' म्हणजे काय ते सांगून प्रमाण भाषा आणि बोली यांच्यातील संबंधाविषयी चर्चा करा. २०

किंवा

आ) बोलींच्या अभ्यासाची गरज व महत्त्व विशद करा व बोलींच्या अभ्यासाची साधने कोणती ते सांगा.

**प्र.४** खालीलपैकी प्रत्येक गटांतील प्रत्येकी एक टीप लिहा. ३०

'अ' गट- १. मानवी भाषेची सर्जनशीलता
२. भाषेचे सौंदर्यात्मक कार्य

'ब' गट- १. भाषा-एक सांस्कृतिक संचित
२. भाषानियोजन

'क' गट- १. बोलींविषयीचे विविध गैरसमज
२. बोलींची व्याकरणे व कोशरचना यांचे महत्त्व

**प्र.५** खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. १०

१. मानवी भाषेची कोणतेही दोन लक्षणे सांगा.
२. मानवी भाषेचे दोन स्तर कोणते?
३. मानवी भाषेची कोणतेही दोन कार्ये सांगा.
४. भाषाद्वित्त्व म्हणजे काय?
५. भाषेच्या ऱ्हासाची कारणे कोणती?
६. भाषानियोजनाची कोणतीही दोन उद्दिष्ट्ये लिहा.
७. बोली म्हणजे काय?
८. मराठीच्या कोणत्याही दोन बोलींची नावे लिहा.
९. बोली भूगोल म्हणजे काय?

****************